# १) पर्यटन

प्रा. अश्विनी खवळे
इतिहास विभाग
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त)


TRAVEL

# पर्यटन म्हणजे काय ? ( Meaning of Tourism)

पर्यटनाला इंग्रजीत *Tourism* म्हणतात. *Tourism* हा शब्द Tour या शब्दापासून व *Tour* हा शब्द लॅटिन भाषेतील *Tornos* या शब्दापासून तयार झालेला आहे.

*Tornos* या शब्दाचे रूपांतर पुढे Tourism असे झाले. या शब्दाचा अर्थ Journey म्हणजे प्रवास असा होतो. हा प्रवास जागेचा शोध घेणे, शिक्षण घेणे, अभ्यास करणे, व्यवसाय आणि आनंदप्राप्तीसाठी होत असतो.

*Tour* या शब्दाचा अर्थ प्रवासी असा असून तो विशेष ठिकाणी जाऊन तेथील सभ्यता, संस्कृती, आर्थिक, सामाजिक शैक्षणिक घटनांचे शोध लावण्याचे काम करीत असतो.

# पर्यटनाचा अर्थ

पर्यटन ही संज्ञा (Tour) या शब्दाशी संबंधित आहे. प्रवास (Tour) हा शब्द लॅटिन भाषेतील
'Tornos' या शब्दापासून आलेला आहे.

Tornos या शब्दाचा मूळ अर्थ वर्तुळ किंवा वर्तुळाकार असा आहे. या शब्दापासूनच 'वर्तुळाका
प्रवास' हा शब्द रूढ झाला, म्हणजे पर्यटक ज्या ठिकाणापासून पर्यटनास सुरुवात करतो, त्या
ठिकाणी विविध स्थळांना भेटी देऊन पर्यटक परत येतो त्यास वर्तुळाकार प्रवास म्हणतात.

Tours या शब्दांची दुसरी एक उत्पत्ती मानली जाते. हा शब्द हिब्रू भाषेतील 'Torah' य
शब्दापासून आलेला आहे. 'Torah' शब्दाचा अर्थ शिकणे, शिकविणे किंवा शोध घेणे म्हणजे
ठिकाणांचा शोध घेण्यासाठी प्रवास करणे.

"पर्यटन म्हणजे मानवाच्या नेहमीच्या राहत्या ठिकाणाहून इतरत्र केलेले अल्पकालीन स्थलांत
होय " किंवा "पर्यटक जेव्हा त्याने निश्चित केलेल्या ठिकाणाकडे जावयास निघतो आणि तेथून
त्याच्या मूळ ठिकाणी परत येतो, या दरम्यान जो कालावधी जातो त्यास पर्यटन म्हणतात." अश
स्वरूपाच्या व्याख्या पर्यटनाच्या संदर्भात रूढ झाल्या आहेत.

# पर्यटनाची व्याख्या

लीग ऑफ नेशन्सची व्याख्या : 'एखाद्या देशाला भेट देणारी व कमीत- कमी १४ तास वास्तव्य करणारी कोणतीही व्यक्ती म्हणजे परदेशी पर्यटक होय.

हरमन श्युलर्ड : या ऑस्ट्रेलियन अर्थशास्त्रज्ञाने पर्यटनाची व्याख्या केली आहे. त्यांच्या मते, 'पर्यटन म्हणजे असा एक आर्थिक कार्यक्रम की, ज्यात लोकांचा प्रत्यक्ष देशांतर्गत किंवा परदेशी प्रवेश, वास्तव्य, भ्रमंती व हालचाल यांच्याशी संबंध आहे.

प्रा. हुंझीकर व प्रा. कार्य या स्वित्झर्लंडच्या प्राध्यापकांच्या मते, 'पर्यटन म्हणजे असा कार्यक्रम की ज्याचा संबंध परकीय प्रवास व वास्तव्याशी आहे. हे वास्तव्य मोबदला देऊन अल्पकाळासाठी असते. पर्यटकाचे वास्तव्य कायमस्वरूपी नसते. ‘

हर्मर : ‘परदेशी माणसाचे एखाद्या देशात, प्रदेशात वा शहरात आगमन, वास्तव्य, भ्रमंती आणि तेथून जाणे म्हणजे पर्यटन होय. ’

राष्ट्रसंघ : पर्यटन ही अशी सामाजिक गतविधी आहे, की ज्यामध्ये एक व्यक्ती कोणत्याही देशामध्ये आपल्या निर्धारित कार्यक्रमाशिवाय २४ तास किंवा त्यापेक्षा अधिक काळ थांबू शकते.

भारतातील व्याख्या : 'परदेशी परवान्याने अभ्यास, मनोरंजन, खेळ, धार्मिक गोष्टी, व्यवसाय, बैठका किंवा एखाद्या विशिष्ट कार्यासाठी भारताला भेट देणारी किमान २४ तास देशात वास्तव्य करणारी व्यक्ती पर्यटक समजावी. '

# पर्यटनातील इतिहासाचे स्थान

- भारतीय इतिहास व संस्कतीला हजारो वर्षांची परंपरा आहे. इतर कोणत्याही देशापेक्षा येथील इतिहास व संस्कृतीचा ठेवा हा अनमोल आहे.
- भारतातील अनेक ऐतिहासिक पर्यटन आणि वस्तसंग्रहालय राज्यांत महत्वाने किल्ले. नद्या. राजवाडे. मंदिरे. लेणी. मस्जिद. समाध्या. कबरी. नद्यांचे घाट इत्यादी अप्रतिम स्मारके आहेत. उदा. आग्रा. दिल्ली, काशी, खजूराहो, राजस्थानमधील किल्ले, राजवाडे, दक्षिण भारतातील विशाल मंदिरे, गोपुरे, कोणार्क, मदुराई इ.
- भारतात कोणत्याही राज्यात आढळन न येणारे जलदर्ग महाराष्ट्रात आहेत. उदा. जंजिरा. सिंधदर्ग. विजयदर्ग, रत्नदर्ग. सवर्णदर्ग असे महाराष्ट्रात अनेक अजिंक्य व बलंद डोंगरी किल्ले आहेत. उदा. रायगड, शिवनेरी, राजगड, सिंहगड, पुरंदर, प्रतापगड, सज्जनगड, पन्हाळा, विशाळगड, देवगिरी, रामसेज इत्यादी.
- यांतील अनेक किल्ले हे छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झाले आहेत. यांतील काही किल्ले छत्रपती शिवरायांनी बांधन काढले आहेत. उदा. राजगड, रायगड, प्रतापगड व सिंधुदुर्ग इ. अशा किल्ल्यांना गिरीदुर्गांना भेट देण्यासाठी पर्यटक आवर्जून येतात.
- महाराष्ट्रातील हे किल्ले सह्याद्रीच्या दर्गम शिखरावर विराजमान असल्यामळे सह्याद्रीचे निसर्गसौंदर्य. उंच शिखर. खोल दऱ्या. कडेकपारी. घनदाट जंगले पाहण्यासाठी पर्यटक आकर्षित होतात. सदाहरित कोकणचा प्रदेश. येथील सागरी किनारे. पवित्र तीर्थस्थळे उदा. पंढरपर. कोल्हापर . जेजरी. शिर्डी. शेगाव. नाशिक. पैठण इ. स्थानांच्या भेटीची ओढ पर्यटकास असते. महाराष्ट्रातील अजंठा, वेरूळ, कार्ले, भाजे इ. लेणी पाहण्यासाठी देशी-विदेशी पर्यटकांचा ओघ दिवसेंदिवस वाढत आहे.


# ऐतिहासिक किल्ले











# युद्धभूमी














# ऐतिहासिक स्मारके










# लेणी व मंदिरे







# ऐतिहासिक शहरे स्थळे












# पर्यटनाची उद्दिष्टे

१. आनंद मिळविणे.

२. मौजमजा करणे.

३. संशोधन करणे.

४. अभ्यास करणे.

५. करमणूक व मनोरंजन करणे.

६. देवदेवतांचे दर्शन घेणे.

७. देशाचा इतिहास व संस्कृती समजून घेणे.

८. ऐतिहासिक कला, स्थापत्य व मूर्तिकलांची पाहणी करणे.

९. शिक्षण घेणे.

१०. आरोग्य.

११. व्यापार व व्यवसायातून पर्यटन करणे.

# पर्यटनाचे स्वरूप (Nature of Tourism)

- विविध कारणांसाठी प्रवास करण्याची मानवाची प्रवृत्ती व परंपरा प्राचीन काळापासून चालत आली आहे. काळाच्या ओघात पर्यटनाचे स्वरूप बदलत गेले आहे. पर्यटनाचे स्वरूप हे परिवर्तनशील आहे.

- विसाव्या शतकाच्या मध्यापासून पर्यटनाकडे आधुनिक उद्योग म्हणून पाहिले जात आहे. प्रारंभी पर्यटनाचे क्षेत्र हे श्रीमंतांपुरते मर्यादित होते.

- देश- विदेशातील सौंदर्यस्थळे, ऐतिहासिक स्थळे व स्मारके पाहून आनंद मिळवणे हा उद्देश होता. पण अलीकडे पर्यटनाची पार्श्वभूमी व उद्देश भिन्न आहेत.

- सर्वसाधारण आर्थिक परिस्थिती असलेले लोकसुद्धा पर्यटन करतात. गेल्या दशकापासून पर्यटनाचे 'लोकशाहीकरण' सुरू झाले आहे.

- विविध खेळ, स्पर्धा उदा. घोडदौड, नौकानयन, ऐतिहासिक पर्यटन आणि वस्तुसंग्रहालय पर्वतारोहण, बर्फावरील घसरगुंडी इत्यादींचा आनंद सामान्य मनुष्यसुद्धा घेऊ लागला आहे.

- त्यामुळे पर्यटकांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे. पर्यटनाचे स्वरूप है उत्तरोत्तर बदलत, विकसित व विस्तारित होत आहे. त्यामुळे पर्यटन हा जगातील एक महत्त्वाचा उद्योग बनला आहे.
- आधुनिक काळात जलद वाहतुकीच्या सुविधांमुळे पर्यटनाचे स्वरूप गतिमान बनले आहे. भविष्यकाळात पर्यटनाच्या स्वरूपात काळाप्रमाणे बदल घडून येईल, कारण पर्यटनाचे स्वरूप हे परिवर्तनशील आहे.

१. पर्यटन हा उद्योग

२. तांत्रिक विकासाची अपूर्व घटना

३. करमणूक

४. गतिशील व स्थिर

५. अनुत्पादक

६. अल्पकालिक किंवा हंगामी

७. धार्मिक आणि सांस्कृतिक

८. ऐतिहासिक

९. भौगोलिक

१०. मौजमजा व आनंदासाठी पर्यटन

११. वाहतूक प्रगती इत्यादी.

rawpixel

# पर्यटनाची व्याप्ती ( Scope of Tourism )

- जगातील ऐतिहासिक, सांस्कृतिक, भौगोलिक, धार्मिक, सामाजिक व आर्थिक घटकांच्या भिन्नता, विविधता ही पर्यटनाची प्रेरणा आहे.

- वरील घटकांच्या नावीन्यपूर्ण विविधतेचा आनंद लुटण्यासाठी पर्यटक सर्व जगभर पर्यटन करतात. आधुनिक काळात पर्यटनाकडे अत्यंत महत्त्वाचा अर्थार्जनाचा व्यवसाय म्हणून सर्व जग पाहात आहे. परिणामी, पर्यटनाचा विकास झपाट्याने होऊन त्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे.

- पर्यटनामुळे आर्थिक प्राप्ती होतेच पण त्याच्या विकासाबरोबर रोजगाराची संधी उपलब्ध होते. त्यामुळे पर्यटनाची व्याप्ती वाढत आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून पर्यटनाची व्याप्ती झपाट्याने वाढत गेली.

- वाहतुकीच्या जलद सोई, दरडोई उत्पन्नातील वाढ, पर्यटन सुविधांचा विकास, पर्यटनाचे लोकशाहीकरण, सामूहिक पर्यटन यामुळे तसेच वाहतुकीची साधने, रस्ते, निवासाच्या सुविधा, हॉटेल्स, फोटोग्राफर्स , गाईड्स, व्यापार, स्थानिक हस्तकला व्यवसाय इत्यादींचा विकास झपाट्याने होऊन पर्यटनाची व्याप्ती दिवसेंदिवस विस्तारत आहे.

- पर्यटन हे स्वतंत्र उद्योग क्षेत्र झाले आहे. यामध्ये स्वयंरोजगार व रोजगार संधी विपुल आहेत. गोवा व केरळ राज्याच्या उत्पन्नाचा मोठा स्रोत पर्यटनच आहे.

# पर्यटनाची वैशिष्ट्ये (Features of Tourism)

- १. ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय अशा विविध घटकांचा संयुक्त आविष्कार पर्यटनात असतो.
- २. पर्यटनात प्रवास हा गतिशील असतो, पण वास्तव्य स्थिर असते.
- ३. पर्यटनात पर्यटकाचे स्थलांतर हे अल्प असते.
- ४. पर्यटनात अर्थार्जन करणे हा हेतू नसतो, तर विविध स्थळांना भेटी देणे हाच फक्त उद्देश असतो.
- ५. पर्यटनातून मिळणारा आनंद, ज्ञान व अनुभव वैयक्तिक तसेच सांघिक स्वरूपाचे असतात.
- ६. पर्यटनात पर्यटकांचा निवास, भोजन, वाहतूक व पर्यटक मार्गदर्शक इ. गोष्टींशी संबंध येतो.
- ७. पर्यटन हे ऋतुमान व हवामानाशी संबंधित असते.
- ८. पर्यटनाचा विकास व विस्तार यावर अनेक देशांच्या अर्थव्यवस्था अवलंबून
- असतात.
- ९. पर्यटनात पर्यटकांच्या आवडीनिवडी, इच्छा व अभिरुची यांचा प्रभाव असतो.
- १०. पर्यटन उद्योगातून रोजगार निर्मिती होते व स्थानिक उत्पादने व व्यापारास 'चालना मिळते.

भारतात १९५० नंतर पर्यटन उद्योगास चालना मिळाली आहे. त्यास पुढील घंटक कारणीभूत ठरले आहेत.

- १. मानवाचे आर्थिकदृष्ट्या उंचावलेले राहणीमान
- २. मध्यमवर्गाच्या अर्थप्राप्तीत वाढ
- ३. नोकरदारांना पर्यटनासाठी मिळणारी रजा व इतर सुविधा
- ४. सर्व प्रकारच्या पर्यटन स्थळांची सहज उपलब्ध होणारी माहिती
- ५. चांगले रस्ते, जलद वेगाने जाणारी वाहने
- ६. रेल्वे मार्गाचे जाळे, वेगवान रेल्वे व रेल्वेच्या सुविधा
- ७. विमान सेवा व सागरी प्रवासाची सहज उपलब्धता
- ८. ऐतिहासिक स्मारके, किल्ले, मंदिरे, श्रद्धास्थळे, राजधान्या, लेणी इत्यादींचे
- आकर्षण
- ९. धार्मिक व पवित्र स्थळांना भेटी देण्याची आध्यात्मिक ओढ .

Adobe Stock | #206541969

- भारतातील पर्यटनाचा अभ्यास करीत असताना प्राचीन काळापासून भारतात पर्यटनाला सुरुवात मात्र अगोदरच्या काळामध्ये केल्या जाणाऱ्या प्रवासाला 'पर्यटन' हा शब्द रूढ झाला नव्हता. परंतु व्यापार आणि धर्मप्रसाराच्या निमित्ताने पर्यटन केले जात होते हे स्पष्ट होते.
- भारतीय पर्यटन विकासाला खरी चालना मिळाली ती भारत स्वतंत्र झाल्यानंतर पर्यटन हा आधुनिक काळातील एक महत्त्वाचा उद्योग बनल्यामुळे या उद्योगाकडे सरकारने जाणीवपूर्वक लक्ष
- परिणामी, पर्यटनक्षेत्राचा विकास करण्याशिवाय सरकारला पर्याय राहिला नाही
- या देशात विविध ठिकाणी प्राचीन स्मारके, ऐतिहासिक वास्तु, मंदिरे, किल्ले व लेणी तसेच शिल्पकला
- याशिवाय भारताला शास्त्रोक्त व लोकसंगीत, लोककला व नृत्याची दीर्घ परंपरा आहे. भारतात असलेली हजारो ऐतिहासिक, धार्मिक आणि पवित्र स्थळे पर्यटकांची वाट पाहात आहेत.
- त्यामुळेच भारताला पर्यटकांचे नंदनवन म्हटले जाते. भारताच्या पर्यटन विकासासाठी भारताची प्राचीन परंपरा व सांस्कृतिक वारसा महत्त्वाचा

## • पर्यटन विकासाचे महत्त्व

पर्यटन हा एक किफायतशीर व्यवसाय आहे. त्यामुळे पर्यटन विकासाला सरकारने महत्त्व दिले आहे. पर्यटन विकासावरच पर्यटन हा उद्योग अवलंबून आहे. भारतात अनेक भौगोलिक, धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळे आहेत. या पर्यटन स्थळांचा विकास केल्यामुळे त्यास पूरक असलेले व्यवसाय व उद्योगांचाही विकास होतो. त्यामुळे पर्यटन विकासाला अधिक महत्त्व प्राप्त झाले. देशात पर्यटकांची संख्या वरचेवर वाढत आहे. त्यामुळे पर्यटनाचा विकास करणे महत्त्वाचे ठरते. पर्यटन विकासामुळेच पर्यटकांची संख्या वाढत जाते.

# पर्यटनाचा हेतू (Motivation of Tourism)


## आनंददायी हेतूने करण्यात येणारे पर्यटन (Pleasure Tourism)

आनंददायी हेतूने करण्यात येणारे पर्यटन फार महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील थंड हवेची पर्यटन ठिकाणे ही आनंददायी पर्यटन केंद्रे बनली आहेत. मनोरंजन, करमणूक व आनंद मिळविणे हाच पर्यटनाचा मुख्य हेतू असतो. दैनंदिन, रोजच्या दिनक्रमातून सुटका करून एका नव्या वातावरणात माणूस, त्याचा मित्रपरिवार, कुटुंबीय आलेले असतात. निसर्गरम्य ठिकाण पाहणे, सृष्टीसौंदर्य पाहणे अशी मानवी मनाची आवड आहे. त्यामुळे माणूस वेगवेगळ्या ठिकाणांना भेटी देत असतो. तसेच तेथील आनंददायी वातावरणाचा, मनोरंजनाचा आस्वाद घेत असतो. उदा. पाचगणी, आंबोली, महाबळेश्वर, मेळघाट, माथेरान, तोरणमाळ, चिखलदरा, भीमाशंकर, लोणावळा, पन्हाळा इत्यादी.

अभयारण्ये व उद्याने यांमध्ये औद्योगिक महानगरांतून प्रदूषित दमट हवा आरोग्यास हानिकारक ठरत आहे. म्हणून तेथील लोक आल्हाददायक हवेच्या ठिकाणी जातात. अभयारण्ये, उद्याने पाहणे म्हणजेच आनंददायी पर्यटन होय. उदा. ताडोबा अभयारण्य, कोयना अभयारण्य, माळढोक पक्षी अभयारण्य, पेंच, नवेगाव राष्ट्रीय उद्यान कर्नाळा, नागार्जुनसागर अभयारण्य इ. तसेच भारतातील काही महत्त्वाची थंड हवेची ठिकाणे आहेत. त्यामध्ये दार्जिलिंग, पंचमढी, सिमला, नैनिताल, जम्मू, कुलू मनाली, उटी इत्यादी.






BHIMASHANKAR

# शैक्षणिक हेतूने करण्यात येणारे पर्यटन (Educational Tourism)

- दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या जागतिक सामंजस्य व एकजिनसीपणाच्या भावनेमुळे शैक्षणिक हेतूने करण्यात येणाऱ्या पर्यटनाच्या क्षेत्राला चालना मिळाली व युनोसारख्या संघटनेनेही या पर्यटनाला प्रोत्साहन दिले.
- दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या राष्ट्रातील समाजाला विज्ञान व तंत्रज्ञानाबरोबरच सामाजिक क्षेत्रात झालेल्या स्वविचारांचे ज्ञान आत्मसात करण्याची जिज्ञासा होती म्हणूनच हे ज्ञान प्राप्त करण्यासाठी विविध राष्ट्रांनी पर्यटन क्षेत्रास चालना दिली. उदाहरणार्थ, वैज्ञानिक व तांत्रिक प्रगती करण्यासाठी जपानने अनेक तरुणांना विकसित पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये शिक्षणासाठी पर्यटन करण्यास प्रोत्साहन दिले.
- त्यामुळे नंतरच्या काळात जपानने या प्रगत राष्ट्रांचे ज्ञान आत्मसात करून काही काळातच त्यांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त केलेले दिसते. पर्यटनाच्या या प्रक्रियेमागे अनेक हेतू असले तरी मानवी जिज्ञासा ज्ञाताकडून अज्ञाताकडे जाण्याची ओढ व दैनंदिन जीवनात कार्यक्षमता टिकवण्यासाठी आवश्यक असलेला बदल हेच पर्यटनाचे प्रमुख हेतू
- हे देशांतर्गत शैक्षणिक पर्यटनाचे एक उत्तम उदाहरण आहे.
- आज आयटी कंपन्या अभियंत्यांची निवड केल्यानंतर त्यांना प्रशिक्षणासाठी पुणे, हैद्राबाद, बंगळुरू, अहमदाबाद, मद्रास, दिल्ली वगैरे ठिकाणी तीन ते सहा महिने ठेवतात. हे एका अर्थी देशांतर्गत शैक्षणिक पर्यटन होय. आज जगात अनेक जण केम्ब्रिज, ऑक्सफर्ड या इंग्लंडमधील तसेच अमेरिकेतील


भारतीय प्रौद्योगिकी संस्थान दिल्ली
INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY DELHI





# सांस्कृतिक हेतूने करण्यात येणारे पर्यटन (Cultural Tourism)

- ✓सांस्कृतिक पर्यटन ही संकल्पना फार मोठी आणि व्यापक. सांस्कृतिक पर्यटनामध्ये लेणी, मंदिरे, वास्तू, शिल्पे, स्मारके, आहार, पेये, नाट्यसंगीत, साहित्य, नृत्य, उत्सव इ. गोष्टींचा समावेश होतो. त्याचबरोबर हस्तकला व कलाकुसरीच्या वस्तूंचाही समावेश सांस्कृतिक पर्यटनामध्ये .
- ✓त्यामुळेच या सांस्कृतिक विविधतेचे ज्ञान आत्मसात करण्याच्या जाणिवेतून केल्या जाणाऱ्या पर्यटनाला युनोच्या वतीने प्रोत्साहन दिले जाते. आधुनिक काळात उपलब्ध झालेल्या जलद संचार व्यवस्थेमुळे एखाद्या राष्ट्रातील समाजाने विकसित केलेल्या आचारप्रणालीचा काही क्षणातच दुसऱ्या देशात प्रसार होणे शक्य झालेले आहे.
- ✓विभिन्न आचार परंपरा व सांस्कृतिक वैशिष्ट्ये असलेल्या समाजात पर्यटनाद्वारे एकजिनसीपणाची भावना निर्माण झाल्यास दीर्घकालीन शांततेच्या निर्मितीसाठी ती उपयुक्त ठरणारी असल्याने आंतरराष्ट्रीय संघटनांनी पर्यटनाच्या क्षेत्राला चालना दिलेली दिसते.
- ✓ भारतात येणाऱ्या पर्यटकांना मानवनिर्मित सुंदर, कलाकुसर असणाऱ्या इमारती, भव्य कलात्मक केंद्रे, प्रचंड चर्चेस इ. चे आकर्षण असते. आज भारतात सांस्कृतिक स्थाने पर्यटन स्थळे म्हणून प्रसिद्ध. उदा. कोणार्क, नालंदा, कन्याकुमारी, म्हैसूर, अजमेर, कांची, वैष्णोदेवी, गया, बुद्धगया, मथुरा, वृंदावन, आग्रा, पुणे, बंगळुरू, कोलकता, तंजावर, दिल्ली, चेन्नई, मुंबई इत्यादी.





# सामाजिक हेतूने करण्यात येणारे पर्यटन (Social Tourism)





- प्रवासात आबालवृद्ध, भिन्न जातीचे, धर्माचे लोक एकत्र येतात. पण ते सर्व सहप्रवासी असल्याने उच्च-नीचतेची त्यांच्यात भावना नसते. त्यामुळे 'एकजिनसी' समाजरचना तयार होण्यास मदत होते. सहप्रवासी दुसऱ्या भाषेतील असल्यास त्यांच्या दरम्यान संवाद करण्यात अडचणीचे होते. लोक सहप्रवाशाच्या चालीरीती जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. शहरात प्रत्येकजण स्वतच्या विचार करतो. ' पैशाने प्रत्येक गोष्ट विकत मिळते' ही भावना असते. याउलट खेडेगावात बरीचशी कामे एकमेकांच्या मदतीने चालतात. पूर्वी ग्राम हे स्वतंत्र राज्य समजत.
- विद्वत्ता, श्रीमंती, उच्च अभिरुची, देहयष्टी व सौंदर्य यातही आपणाहून सरस लोक भेटतात. अशा वेळी अहंभाव गळून आपण किती क्षुद्र आहोत याची कल्पना.

# आर्थिक हेतूने करण्यात येणारे पर्यटन ( Economical Tourism)

बहुसंख्य सौंदर्यस्थळे दुर्गम प्रदेशात आढळतात. त्या ठिकाणी पर्यटकांना जाण्यायेण्यासाठी मोटारमार्ग, लोहमार्ग, विमानमार्ग, जलमार्ग निर्माण करावे लागतात. या सुविधा निर्माण करताना पुष्कळ लोकांना 'रोजगार' उपलब्ध होतो. पर्यटकांच्या दैनंदिन गरजांच्या पूर्तीकरिता खाजगी, सरकारी मालकीची निवासस्थाने बांधावी लागतात. शिवाय लहान-मोठी उपहारगृहे, स्वच्छतागृहांची आवश्यकता असते. पर्यटकांच्या मनोरंजनासाठी सुविधा उपलब्ध करावी लागते. थोडक्यात, नवीन नगराची उभारणी करावी लागते. यासाठी पूर्वनियोजन करून वीज, पाणी, शिक्षण, वैद्यकीय सेवा, दळणवळण सुविधा उपलब्ध कराव्या लागतात. निरनिराळ्या सेवानिर्मितीमुळे स्थानिक व जवळपासच्या लोकांना कामधंदा उपलब्ध होतो.

पर्यटकांचे सामान वाहून नेण्यासाठी कुली, सामानाची देखभाल करण्यासाठी सेवाभावी व्यक्ती, संस्था, पर्यटन स्थळांची सुयोग्य माहिती सांगणारे प्रशिक्षित मार्गदर्शक यांना रोजगार उपलब्ध होतो. प्रवाशांच्या जाण्या-येण्यासाठी टांगा, रिक्शा, मोटार इत्यादी वाहनांची आवश्यकता असते. पर्यटक परत जातेवेळी कलाकुसरीच्या वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी घेऊन जातात. कसबी लोक खेड्यापाड्यात भारतभर विखुरलेले आहेत. अशा कुशल लोकांना कामधंदा उपलब्ध होतो. त्यांच्या हस्तकलेचा विकास होतो. पर्यटकांना आवडलेल्या वस्तू त्यांच्या गावी नाममात्र पैसे घेऊन व्ही. पी. ने पाठविण्याची व्यवस्था दुकानदार करतात. दळणवळण ठेवता यावे याकरिता पोस्ट, दूरध्वनीची सोय असते. सुरक्षिततेच्या दृष्टीने पैशाचे व्यवहार करता यावे म्हणून निरनिराळ्या बँका आपली कार्यालये अशा पर्यटनस्थळी सुरू करतात.

# धार्मिक हेतूने करण्यात येणारे पर्यटन (Religious Tourism)

धर्मप्रसार हा पर्यटनामागील एक हेतू असतो. ख्रिश्चन धर्माच्या स्थापनेनंतरच्या काळात त्या धर्माचा मोठ्या प्रमाणावर प्रसार घडवून आणण्यासाठी निरनिराळ्या देशांतून पर्यटन केले. युरोपातून आशिया व आफ्रिका या देशांत येणारे पर्यटक धर्म प्रसाराच्या हेतूनेच येत असत. ख्रिश्चन, इस्लाम या धर्मांच्या प्रसारासाठी मोठ्या प्रमाणावर पर्यटन केले जाते. प्राचीन भारतातही बौद्ध धर्माच्या स्थापनेनंतर धर्मप्रसारासाठी बौद्ध भिक्षू संघ ठिकठिकाणी जात असत. सम्राट अशोकाने धर्मप्रसारासाठी परदेशातही बौद्ध भिक्षू पाठविले होते. काही वेळा तीर्थक्षेत्रांना भेटी देण्याच्या उद्देशाने किंवा आपल्या धर्माच्या मूळ ग्रंथाचा अभ्यास करण्याच्या जाणिवेतून पर्यटन केले गेलेले दिसते. धर्मप्रसाराबरोबरच इतर धार्मिक बाबींसाठीही आधुनिक काळात पर्यटन केले जाते. काही विशिष्ट धार्मिक समारंभाच्या निमित्ताने पर्यटन केले जाते. भारतात यात्रा, कुंभमेळा, उरूस, हज इ. तीर्थक्षेत्री लोक मोठ्या संख्येने जातात. धार्मिक कारणांमुळे पर्यटन क्षेत्राचा विकास झाला आहे. भारतात मोठ्या प्रमाणावर धार्मिक स्थळे आहेत. उदा. तिरुपती, सोमनाथ, द्वारका, कोणार्क, वैष्णोदेवी मंदिर, मथुरा वृंदावन, जगन्नाथपुरी, वाराणसी, हरिद्वार, ऋषिकेश इत्यादी. तसेच महाराष्ट्रातील शिर्डी, शेगाव, गणपतीपुळे, जेजुरी, देहू, पैठण, रामटेक, आळंदी, पंढरपूर, ज्योतिबा इत्यादी.






# आरोग्य या हेतूने करण्यात येणारे पर्यटन (Health Tourism)

स्वच्छ हवा, सतेज सूर्यप्रकाश असलेल्या हवेत शारीरिक तक्रारी कमी होऊन प्रकृती सुधारते. म्हणून उदकमंडल, कौसानी, बुलढाणा, कार्ला इत्यादी ठिकाणी सॅनिटोरियम आहेत.

अशा ठिकाणी क्षय, पंडूरोग, कुष्ठरोगावर उपचार करतात. समुद्र किनाऱ्यावरील मंद हवा, समुद्रस्नान, सूर्य स्नानाचा फायदा होऊन थकवा दूर होतो. अशा किनारी रिसॉर्टवर पर्यटन खात्यामार्फत निवासस्थाने बांधली आहेत.
माणसाची काम करण्याची क्षमता २०° ते २५° से. तापमानास सर्वाधिक असते. असे हवामान खंडाळा, बुलढाणा, यवतमाळ, हैद्राबाद, मध्यम उंचीच्या ठिकाणी वर्षभर आढळते. म्हणून यांना स्पा किंवा आरोग्यधामे म्हणता येईल.

जमिनीत मुरणाऱ्या पाण्यात गंधक, बेरियम, दुर्मीळ माती मिसळून ते औ बनते. असे पाणी उष्ण खडकाच्या सान्निध्यात गरम होऊन झऱ्याच्या रूपाने जमिनीवा येते. अशा औषधी कुंडात स्नान केल्याने त्वचेचे रोग बरे होतात.








# ऐतिहासिक हेतूने करण्यात येणारे पर्यटन (Historical Tourism)

खंडप्राय भारतात अनेक राज्ये, साम्राज्ये होऊन गेली. मोगल, ब्रिटिशांशिवाय राजपूत, मराठे, पेशवे, पल्लव इत्यादी राज्ये मध्ययुगीन कालात होऊन गेली. . प्रत्येकांनी काही वैशिष्ट्यपूर्ण वास्तू निर्माण केल्या. त्यापैकी काही कालौघात नष्ट झाल्या. काही आजही संपूर्ण भारतभर विखुरलेल्या आहेत. रायगड, चित्तोड, रणथंभोर, अजमेर, ग्वाल्हेर, गोवळकोंडासारखे भक्कम गड शौर्याची प्रतीके आहेत. जंजीरा, सिंधुदुर्ग, वादळी सागरलाटांशी झुंज देत आजही मराठ्यांच्या आरमाराची शौर्यगाथा सांगताहेत. दिल्लीचा लाल किल्ला, कुतुबमिनार, आग्रा येथील ताजमहाल, फत्तेपूर सिक्रीचा बुलंद दरवाजा, जगनिवास, नर्मदातटीचा मांगवगड, म्हैसूरचे राजवाडे, हैद्राबादचे सालारजंग वस्तुसंग्रहालय, श्रीरंगपट्टणमचे टिपू साम्राज्य, औरंगाबादमधील बीबी का मकबरा, विजयनगरचे भग्न साम्राज्य, विजापूरचा गोलघुमट अशा प्रेक्षणीय वास्तू देशभर विखुरलेल्या आहेत. धर्म, पंथ, संस्कृतीची विविधता मेळे, उत्सव, सण, उरूस यांमधून दिसून येते.








thank you